**''आवडेल तेथे कोठेही प्रवास'' योजनेअंतर्गत पासाचे दर अटी व शर्तीबाबत.**

**आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेच्या पासांचे सुधारीत दर दिनांक २/०५/२०१० ( दिनांक १/०५/२०१० व २/०५/२०१० ची मध्यरात्र) पासून अंमलात आणण्यात आले आहेत.**

या पासांच्या योजनेसाठी खालील प्रमाणे दोन हंगाम आहेत.

१. गर्दीचा हंगाम - १५ ऑक्टोबर ते १४ जून.
२. कमी गर्दीचा हंगाम - १५ जून ते १४ ऑक्टोबर.

आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेत आतापर्यंत दोन्ही हंगामात १० व ४ दिवसाचे पास देण्यात येत होते, त्यात बदल करण्यात आला असून दिनांक २/०५/२०१० पासून ७ व ४ दिवसाचे पास देण्यात येतील. दिनांक २/०५/२०१० पासून १० दिवसाचे पास देण्याचे बंद करण्यात आलेले आहेत.

दिनांक २/०५/२०१० पासून देण्यात यावयाचे आवडेल तेथे कोठेही प्रवासाच्या ७ व ४ दिवसांच्या पासांचे दर खालील प्रमाणे.

| वाहतूक सेवेचा प्रकार | ७ दिवसाच्या पासाचे मूल्य | | | | ४ दिवसाच्या पासाचे मूल्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गर्दीचा हंगाम | | कमी गर्दीचा हंगाम | | गर्दीचा हंगाम | | कमी गर्दीचा हंगाम | |
| | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले |
| साधी (साधी,जलद,रात्रसेवा,शहरी, जनतासेवा, मिनी / मिडी बस) | ९५० | ४७५ | ८७५ | ४५० | ५५० | ३०० | ५०० | २५० |
| निमआराम बस | ११०० | ५५० | १००० | ५०० | ६२५ | ३२५ | ५७५ | ३०० |
| आंतरराज्य (साधी, निमआराम) | ११७५ | ६०० | ११०० | ५५० | ६७५ | ३५० | ६२५ | ३०० |

(वर दर्शविलेले मुलांच्या पासाचे दर ५ वर्षापेक्षा जास्त व १२ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी आहेत.)

**या योजनेचे मुख्य नियम खालील प्रमाणे:**

१. या योजनेअंतर्गत ७ व ४ दिवसाचे पास दिले जातील.

२. साध्या सेवा (साधी, जलद, रात्रसेवा, शहरी, जनतासेवा, मिनी, मिडीबस), निमआराम, व आंतरराज्य सेवेच्या (साध्या व निमआराम) बसेसना ही योजना लागू करण्यात आली आहे.

३. आंतरराज्य वाहतूकीवरील बसेससाठी दिला जाणारा पास साधी सेवा व निमआराम सेवेच्या बसेसमध्ये महाराष्ट्र राज्यातसुध्दा वैध राहील.

४. या योजनेचे पास प्रवास सुरू होण्याच्या १० दिवस अगोदर देण्यात येईल.

५. या योजनेअंतर्गत देण्यात आलेले पास नियमीत गाडीसोबतच कोणत्याही जादा बसमध्ये किंवा पंढरपूर / आळंदी, गौरी गणपती, होळी, इत्यादि प्रसंगी सोडण्यात येणा-या जादा बसमध्ये किंवा यात्रा बसमध्ये वैध राहातील.

६. सध्या चालनात असलेल्या पासावर कोणत्याही जादा बसमध्ये किंवा पंढरपूर / आळंदी, गौरी गणपती, होळी, इत्यादि प्रसंगी सोडण्यात येणा-या जादा बसमध्ये किंवा यात्रा बसमध्ये वैध राहाणार नाही असे नमूद केलेले आहे. आता सर्व बसमधून परवानगी दिल्याने सदरचा नियम रद्द होत आहे म्हणून त्यावर ******** अशा आडव्या रेषा मारण्यात याव्यात की जेणे करून प्रवाशांना त्यामुळे कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. सदर पासावर प्रवास करणा-या प्रवाशाना ते पासधारक आहेत म्हणून प्रवास नाकारू नये परंतु पास धारकांसाठी जादा अथवा खास बस सोडण्यात येणार नाही.

८. गाडीतील आसनासाठी हमी देता येणार नाही. परंतु या योजनेतील पास धारकाना आसन आरक्षित करावयाचे असल्यास तो आपल्या बसचे आरक्षण करू शकतो. त्यासाठी त्यास आरक्षणाचा प्रचलित आकार देऊन आरक्षणाचे तिकीट घ्यावे लागेल. मात्र आरक्षण तिकीटावर पासाचा क्रमांक घालणे आवश्यक आहे.

९. या योजनेअंतर्गत प्रौढ पासधारकास ३० किलो पर्यंत व मुलास १५ किलोपर्यंतचे सामान विनाआकार नेता येईल.

१०. उच्च दर्जाच्या सेवेचा पास निम्न दर्जाच्या सेवेस वैध राहील. जसे, निमआराम बसचा पास साधी, जलद, रात्रसेवा, शहरी, जनतासेवा, मिनी व मिडी बसला वैध राहील.

११. प्रत्येक पासावर पासधारकाचा फोटो लावणे आवश्यक आहे.

१२. या पुर्वी दिलेल्या सुचनेनुसार १० दिवस अगोदर पासेस दयावयाच्या पध्दतीनुसार दिनांक २/०५/ २०१० पुर्वी दिलेले परंतु दिनांक २/०५/२०१० पासून चालू होणारे किंवा २/०५/२०१० ला चालू असलेले पास त्यांची मुदत संपेपर्यंत वैध राहातील व अशा पासधारकाकडून दरातील फरक वसूल केला जाणार नाही. परंतु आवडेल तेथे कोठेही प्रवास या योजनेतील झालेल्या दरातील बदलाची सूचना मिळाल्यानंतर २/०५/२०१० पासून लागू करावयाच्या व त्यासाठी वितरीत करावयाच्या पासेसना दिनांक २/०५/२०१० पासून लागू होणा-या दरांची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

१३. पासावर पंचींग पध्दत सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे वाहकाने प्रवासाच्या तारखेच्या अंकाची टिकली पडून छिद्र पडेल अशा पध्दतीने पंच करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. एक वेळ पंच केलेला पास पुन्हा पंच करण्याची आवश्यकता नाही. पासावरील प्रवासाच्या तारखेस पास पंच केलेला असला तरी पासाच्या मुदतीत प्रवासी प्रत्येक दिवशी कोणत्याही मार्गावर कितीही वेळा त्या पासावर प्रवास करू शकेल.

१४. राप / वाह / सामान्य - ८८ / ८०७२ दिनांक २.११.१९९८ - वाहतूक खाते परिपत्रक क्र. ३०/१९९८ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार घरातील नातलगाचा मुत्यू, भुकंप, आग लागणे, अतिवृष्टी, महापूर नैसर्गिक आपत्ती इत्यादी कारणांमुळे पासधारकास पास रद्द करावयाचा असल्यास व त्याने तसे प्रवासाच्या तारखेपुर्वी पुराव्यासह कळविले असल्यास प्रत्येक पासामागे रू.१०/- सेवा शुल्क वसुल करून उर्वरीत रकमेचा त्यास परतावा देण्यात यावा. परंतु अशा बाबतीत सदर पासावर पुढील तारखेस प्रवास करण्याची प्रवाशाची इच्छा असल्यास त्याचा जुना पास रद्द करून त्याला नवीन पास देण्यात यावा, अशा प्रकरणी सेवा शुल्क आकारू नये. यासाठीचे अधिकार विभागीय वाहतूक अधिकारी / आगार व्यवस्थापक याना देण्यात आलेले आहेत.

१५. वाहतूक खाते परिपत्रक क्र. ३९/२००६ - राप / वाह / चालन / सा.८८ / ६७१० दिनांक ९ ऑक्टोबर, २००६ अन्वये जर एखादा प्रवासी अचानक आजारी झाला व त्यास प्रवास करणे शक्य नसेल आणि त्याने तसा वैद्यकिय दाखला सादर केल्यास त्यास हा पास रद्द करताना पुर्वी घेत असलेले सेवा शुल्क रू.१०/- आकारून पास रद्द करावा, जर त्या प्रवाशाची नंतर प्रवास करण्याची इच्छा असेल व त्याने तारीख बदलून किंवा नवीन पास मागितल्यास त्यास जुना पास रद्द करून नवीन पास देण्यात यावा. जुना पास रद्द करून नवीन पास देताना सेवा शुल्क आकारू नये. सदरचे अधिकार हे पुर्वी प्रमाणेच विभागीय वाहतूक अधिकारी / आगार व्यवस्थापक याना देण्यात आलेले आहेत.

१६. या योजनेत पासधारकाचा प्रवास संपल्यानंतर पास परत करावयाचा नसल्याने त्याचा गैरवापर टाळण्याच्या दृष्टीने सर्व तपासणी कर्मचारी तसेंच वाहक हे या पासावर प्रवास करणा-या पास धारकाच्या पासाच्या कालावधीची खात्री करतील.

१७. दिनांक २/०५/२०१० पासून लागू करावयाचे नवीन पासेस उपलब्ध होईपर्यंत सध्या वापरात असलेल्या त्या त्या सेवेच्या वर नमुद केलेल्या पासांच्या मुल्यात रबरी शिक्याने मुल्य परिवर्तन करून जुन्या पासावरील मुल्य खोडून त्या ठिकाणी नवीन मुल्य दर्शवून ते पास वापरण्यात येतील.

१८. पास हरविल्यास त्याचे ऐवजी दुसरा पास देण्यात येणार नाही त्यामुळे हरविलेल्या पासावर या योजनेखाली प्रवास करता येणार नाही, तसेंच डुप्लीकेट पास मिळणार नाही. सदर हरविलेल्या पासाचा कोणताही परतावा मिळणार नाही.

१९. सदरचा पास अहस्तांतरणीय राहील. तसेंच या पासावर खाडाखोड केल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही.

२०. प्रवासात गाडी नादुरूस्त झाल्यास, वैयक्तीक वस्तु हरविल्यास अथवा कोणतेही नुकसान झाल्यास महामंडळ जबाबदारी स्विकारणार नाही.

२१. आवडेल तेथे कोठेही प्रवासाच्या पासाच्या दिवसाची गणना ००.०० ते २४.०० अशी करण्यात येते. प्रवासी ७ किंवा ४ दिवसाचा पास घेऊन ज्यावेळी प्रवास करीत असतो व त्या पासाच्या प्रवासाच्या शेवटच्या दिवशी रात्री २४.०० वां. पास संपल्याने वाहकाने सदरचा पास तपासणे आवश्यक आहे. पासाच्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी जर रात्री २४.०० नंतर पास संपला असेल व प्रवासी प्रवास करीत असेल तर ज्या ठिकाणी पास संपला असेल तेथून पुढील प्रवासाठी त्याचेकडून पुढील प्रवासाचा आकार वसुल करण्यात येईल. अन्यथा त्याच्या पासाची मुदत संपल्याने व पुढील प्रवासाचे तिकीट न घेतल्याने तो विनातिकीट प्रवास करीत असल्याचे समजून पुढील कारवाई करण्यात येईल. परंतु पास संपल्याने प्रवासाचे पुढील तिकीट घेणे ही सर्वस्वी प्रवाशाची जबाबदारी आहे त्याचप्रमाणे मार्गात पास तपासून पुढील प्रवासाचे तिकीट देणे ही वाहकाची जबाबदारी राहील.

२२. काहीवेळा रा.प.बसेस उशिरा सुटल्यामुळे, वाटेत बिघाड झाल्यामुळे अगर वाटेतील अडथळ्यामुळे शेवटच्या दिवशी म्हणजे पासाची मुदत संपल्याच्या दिवशी जी बस २४.०० वाजणेपुर्वी इच्छितस्थळी पोहोचणार होती ती ००.०० वाजलेनंतर पोहोचते त्यामुळे पासाची मुदत संपली म्हणून पासधारकांकडून जादा भाडे वसुल केले जाते, तसा आकार वसुल करू नये. परंतु सदरची बस ००.०० पुर्वी सुटली असल्यासच व पासधारक प्रवाशाचा प्रवास खंडीत झाला नसल्यास ही सवलत अनुज्ञेय राहील.

=====

## विद्यार्थी, अन्य सामाजिक घटक व सर्वसामान्य प्रवासी वर्गाला दिलेल्या सवलतीच्या (त्रैमासिक पास) भाड्याची सुधारीत दराने आकारणी करण्याबाबत.

दिनांक १३ मार्च, २०१० पासून भाडे दरातील झालेल्या बदलानुसार आपल्या विभागांकडून मासिक / त्रैमासिक पासांचे दर सुधारित करण्यात आले आहेत. नवीन बदलानुसार त्रैमासिक योजनेत प्रवाशाला त्याला ज्या मार्गावर प्रवास करावयाचा आहे त्यामार्गाचे ४५ दिवसाचे परतीचे भाडे भरून त्रैमासिक पास घेऊन प्रवास करता येतो. म्हणजेच या योजनेत ४५ दिवसाच्या प्रवासाची रक्कम भरल्याने त्यांना त्या त्या मार्गावर तीन महिन्याचा प्रवास करता येतो. आतां या योजनेत बदल करण्यात येत असून ४५ दिवसाच्या परतीच्या प्रवास भाड्याऐवजी ५० दिवसाचे परतीचे प्रवास भाडे भरून त्रैमासिक पास देण्यात येतील. इतर अटी व शर्तीत (कार्यपध्दती) बदल करण्यात आलेला नाही. त्यास अनुसरून खालील प्रमाणे सुधारीत सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

प्रवाशाना मासिक, त्रैमासिक पास योजना अनुज्ञेय आहे. दैनंदिन प्रवास करणा-या प्रवाशांना २० दिवसाचे प्रवास भाडे आकारुन मासिक पास दिला जातो तसेच, ४५ दिवसा ऐवजी ५० दिवसाचे प्रवास भाडे आकारुन नव्याने त्रैमासिक पास देण्यात यावा. या योजनेअंतर्गत साधी व निमआराम सेवेचे दि. २ मे, २०१० व त्यानंतर पासेस घेणा-या पासधारकांना दिनांक १३.०३.२०१० चे भाडेवाढीचे सेवानिहाय टप्पादरानुसार प्रवाशांना साधी व निमआराम सेवेच्या नवीन दरपत्रकानुसार प्रवास भाडे आकारणी करुन त्यानुसार पासेसचे मुल्य निश्चित करावे व पास देण्यात यावेत. दिनांक २मे, २०१० पूर्वी पासेस घेतलेल्या तथापि, त्या पासाची मुदत दिनांक २मे, २०१० नंतर संपत असेल, अशा पास धारकाकडून कोणत्याही प्रकारे भाडेवाढीची फरकाची रक्कम वसूल करण्यात येणार नाही. मात्र, दिनांक २मे,२०१० पासून सदर पासेस नुतनीकरणाकरीता प्राप्त झाल्यास नवीन भाडे दरपत्रक दरानुसार (४५ दिवसाऐवजी ५० दिवसाचे टप्पा निहाय भाडे)पासांचे मुल्य निश्चित करुन आकारणी केली जाईल.

मासिक पास योजनेत २० दिवसाच्या परतीच्या प्रवासाचे भाडे भरून मासिक पास देण्यात येतो. सदरच्या योजनेत कोणताही बदल केला नसून पुर्वीप्रमाणेच आकारणी अनुज्ञेय राहील.

****